# **Press note**

गडचिरोली दि. ०१/०७/२०१७

## ***गडचिरोली पोलीस जवानाची ऐतिहासीक कामगिरी***

गडचिरोली पोलीस दलात सी-६० पथकात पोलीस नाईक पदावर कार्यरत असलेले शूर जवान किशोर गोपालदास खोब्रागडे यांनी जगातील सर्वात उंच आणि अवघड रस्त्यांवरुन बाईक राईडिंग करुन गडचिरोली जिल्हा पोलीस दलाचे नाव उज्जवल केले.

किशोरने जगातील सर्वात उंचीवर असलेले खारडोंगला रोड (१८,३८० फुट), तागलंगला रोड (१७,५८२ फुट), चांगला रोड (१७,५६६ फुट) हे ठिकाणे अवघे तेरा दिवसात २४०० किलोमीटरचा प्रवास प्रतिकूल परिस्थितीवर मात करत रॉयल इन फिल्ड बाईकवर पुर्ण करुन इतिहास घडवला व गडचिरोली पोलीसांचे नाव झळकविले.

गडचिरोली पोलीस जवान हे नक्षलवाद संपवण्यासाठी अथक परिश्रम घेतात. प्रसंगी त्यांना आपला जीवही गमवावा लागतो. आदिवासी व नक्षलग्रस्त भाग तसेच अनेक दैनंदिन समस्यांशी लढा देत किशोर सन-२००७ ला पोलीस विभागामध्ये भरती झाला. किशोरला कामाची प्रचंड आवड असल्याने पोलीस प्रशिक्षणानंतर सी-६० पथकामध्ये सामील होवून नक्षलविरोधी अभियानात विविध चकमकीमध्ये सहभाग घेवून नक्षल्यांमध्ये आपला दरारा निर्माण केला. नक्षलविरोधी अभियानामध्ये दररोज पहाडी, जंगल, नद्या, नाले तुडवताना आपणही काहीतरी साहस करावे असा विचार किशोरच्या मनात येत असे. सन-२०१३ मध्ये उत्तर भारतात फिरत असतांना किशोरने या भागातील निसर्ग सौंदर्य व या सौंदर्यास थरारक रुप देणारे रस्ते पाहून आपण जगातील सर्वात उंच असणारे रस्ते कि जे भारतात आहेत हे रस्ते आपण मोटारसायकलने प्रवास करावेत हे त्याने मनोमन ठरवले. सन-२०१३ पासून पाहिलेले स्वप्न पुर्ण करण्यासाठी तो आजपर्यंत धडपडत होता. अखेर आज त्याचे स्वप्न पुर्ण झाले. हिमवादळ, रक्त गोठवणारी थंडी, बर्फाच्छादीत रस्ते, -१५अंश सें. तापमान, एका बाजुला पहाडी तर दुसऱ्या बाजुने जीवघेणी दरी अशा प्रतीकुल परिस्थितीवर मात करुन प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर किशोरने हे जगातील सर्वात उंचावरील रस्ते पार करत कौतुकास्पद यश मिळविले.

नक्षलवाद समुळ नष्ट करण्याचे ध्येय साध्य करण्याबरोबरच गडचिरोली पोलीस जवान असा अनोखा इतिहास घडवत आहेत. किशोरच्या या साहसी व कौतुकास्पद अशा कामगिरीबद्दल पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख साो. यांनी किशोरचे अभिनंदन करुन भविष्यातही अशी कामगिरी करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

जिंकण्याची खरी इच्छाशक्ती असेल तर तुमची सर्व स्वप्ने पुर्ण होवू शकतात हे किशोरने या घटनेवरून दाखवून दिले आहे.




